# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# नागोजीराव पाटणकर वाचनालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे आयोजन

▲ पाटण, दि. ३० : विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन समाजात वाचनसंस्कृती रुजावी यासाठी येथील श्री. नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालयात १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष चंद्रहार निकम यांनी केले आहे.

शासनाने सर्व शासनमान्य ग्रंथालयांच्या माध्यमातून १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे. या आवाहनास प्रतिसाद देत येथील श्री. नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालयाच्यावतीने हा उपक्रम साजरा करण्यात येत असून वरील कालावधीमध्ये वाचनालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष चंद्रहार निकम यांनी दिली.

गेली ८० वर्ष अव्याहतपणे ज्ञानदानाचे कार्य करणारे हे वाचनालय तालुक्यातील वाचनसंस्कृती संवर्धनाचे केंद्र असून जिल्ह्यातील आदर्श ग्रंथालयांपैकी एक असलेल्या या ग्रंथालयास आजवर अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या वाचन पंधरवडा निमित्त वाचनालयात ग्रंथप्रदर्शन, सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा, तसेच अधिकाधिक वाचक सभासद नोंदणी करणे आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

वाचनालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात जास्तीजास्त ग्रंथप्रेमींनी सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन वाचनालय प्रशासनाकडून करण्यात आले आहे.